# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## - परिपत्रक -

या परिपत्रकाद्वारे सूचित करण्यात येते की, विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक व प्रशासकीय विभागांकरिता तसेच अहमदनगर आणि नाशिक उपकेंद्राकरिता 'शिपाई (प्रशिक्षणार्थी)' हे पद 'रोजगार प्रोत्साहन कार्यक्रमातंर्गत' EPP अन्वये दरमहा रु.१००००/- (अक्षरी रुपये दहा हजार फक्त) या एकत्रित विद्यावेतनावर फक्त सहा महिन्यांच्या कालावधीकरिता भरण्याकरिता शासनाच्या कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता संचालनालयाच्या www.rojgar.mahaswayam.in या संकेतस्थळावर Vacancy Order नोंदविण्यात आलेली आहे. 'शिपाई (प्रशिक्षणार्थी)' या पदाकरिता १० वी उत्तीर्ण अशी शैक्षणिक अर्हता असून सदर पदाकरिता वय, आरक्षण व एकूण पदसंख्या इत्यादीबाबतची सविस्तर माहिती सदर संकेतस्थळावर देण्यात आलेली आहे.

'शिपाई (प्रशिक्षणार्थी)' या पदाकरिता ऑनलाईन पध्दतीने अर्ज करण्याकरिता जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राकडे नांवनोंदणी केलेली असणे आवश्यक आहे. ज्या उमेदवारांनी जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राकडे नांवनोंदणी केलेली नाही अशा उमेदवारांनी www.rojgar.mahaswayam.in या संकेतस्थळावर जाऊन Jobseekar द्वारे Registration करावे. तद्नंतर सदर संकेतस्थळावर शिपाई (प्रशिक्षणार्थी) या पदाकरिता ऑनलाईन पध्दतीने अर्ज करणे आवश्यक राहील. उमेदवारांकरिता ऑनलाईन पध्दतीने अर्ज करण्याकरिता अंतिम दिनांक १०.०६.२०१९ असा आहे.

(डॉ.प्रफुल्ल पवार)
कुलसचिव

गणेशखिंड, पुणे ४११ ००७
जा.क्र. : एएन/ 1844
दिनांक : 14 MAY 2019